मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २९२ सातारा ✻ गुरूवार दि १८ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# अवघे गरजे पंढरपूर !

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठुरायाची शासकीय महापूजा संपन्न

**मुंबई :** यंदा आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांची पत्नी यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत मानाचे वारकरी म्हणून शेतकरी बाळू शंकर अहिरे (वय ५५ वर्षे) आणि त्यांची पत्नी आशाबाई बाळू अहिरे (वय ५० वर्षे) मु. पो. अंबासन, ता. सटाणा जि. नाशिक यांना महापूजेचा मान मिळाला. अहिरे दाम्पत्य गेल्या १६ वर्षापासून नियमितपणे वारी करत आहेत.

**चांगला पाऊस होऊ दे, बळीराजा सुखी होऊ दे**

पांडुरंगाच्या आशीर्वादाने सलग तीन वर्षे विठ्ठलाची महापूजा करण्याची संधी मला मिळाली. त्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजतो. पाऊस चांगला झाला आहे. पेरण्या झाल्या, दुबार पेरणीचे संकट नाही. यंदा मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत. पांडुरंगाच्या आशीर्वादाने हे सरकार चांगले काम करत आहे. चांगला पाऊस होऊ दे, बळीराजा सुखी होऊ दे. या राज्यातील प्रत्येक घटक सुखी आणि समृद्धी झाला पाहिजे, असे साकडं एकनाथ शिंदे यांनी विठ्ठलाला घातले.

### वारकऱ्यांना पहिले प्राधान्य

**७३ कोटी संवर्धन जतन संवर्धन करण्यासाठी दिले. त्याचाही उपयोग होतोय. चांगलं काम होतंय. म्हणून मी मनापासून आपल्या सगळ्यांना खूप खूप शुभेच्छा. आज खरं म्हणजे सगळ्यांना आज आपली पूजा चालू असताना देखील मुखदर्शन बंद केले नाही. ते चालू ठेवलं कारण शेवटी अठरा अठरा तास आपले वारकरी रांगेमध्ये उभे राहतात आणि त्यांना पांडुरंगाचे दर्शन घ्यायचं असतं. पण आपल्या शासकीय पूजेमध्ये दर्शन बंद केले जायचे. पण गेल्यावर्षीपासून आपलं मुखदर्शन देखील सुरु ठेवलं. व्हीआयपी लोकांपेक्षा वारकऱ्यांना पहिले प्राधान्य देण्याचं काम आपण केलंय, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.**



### शिंदे कुटुंबातील चार पिढ्यांनी एकत्र केली पूजा

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कुटुंबातील चार पिढ्यांनी एकत्र येऊन ही महापूजा संपन्न केली. श्री विठ्ठल रुक्मिणीच्या शासकीय महापुजेसाठी स्वत: एकनाथ शिंदे आणि त्यांची पत्नी, वडिल संभाजीराव शिंदे, मुलगा श्रीकांत शिंदे आणि त्यांच्या पत्नी वृषाली, नातू रुद्रांश हे या पूजेत सहभागी झाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी विठुरायाला चांगला पाऊस होऊ दे, बळीराजा सुखी होऊ दे, असे साकडे विठ्ठलाला घातले.**

# पोलीस बंदोबस्तात शिवरायांची वाघनखं साताऱ्यात

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या प्रमाणावर वापरलेले शस्त्र १९ जुलै रोजी साताऱ्यात आणले जाणार आहे. ती सध्या मुंबईत पोहोचली आहे. साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, वाघ नाखची पुनरागमन ही महाराष्ट्रासाठी मोठी प्रेरणा आहे. साताऱ्यात आम्ही त्याचे वारशाप्रमाणे जल्लोषात स्वागत करू.

जसजशी १९ जुलै जवळ येत आहे, तसतशी साताऱ्यात जोरदार तयारी सुरू आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेले 'वाघ नाख पौराणिक शस्त्र साताऱ्यात आणले जात आहे. त्यापूर्वी साताऱ्यात मोठा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

लंडनमधील व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियममधून ही वाघनखे तीन वर्षांसाठी भारतात आणली आहेत. या ऐतिहासिक वाघनखांचे महाराष्ट्राची राजधानी मुंबईत स्वागत करण्यात आले. त्यानंतर, स्वराज्याची राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेल्या साताऱ्यात ही वाघनखं पोलीस बंदोबस्तात नेण्यात आली. साताऱ्यातील संग्रहालयात पुढील दहा महिने ही वाघनखे इतिहासप्रेमींसह सर्व नागरिकांना पाहता येणार आहे.

### १९ जुलैला भव्य सोहळा



शतकानुशतके मराठा सम्राटांनी वापरलेले प्राणघातक शस्त्र लंडनमधील दूरच्या एका संग्रहालयात ठेवण्यात आले होते. आता महाराष्ट्र सरकारच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर अखेर वाघ नखं साताऱ्यात आणली जात आहे.

साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातील सुरक्षा व्यवस्थेची स्वत: देखरेख केली, जिथे वाघ नख पुढील सात महिने प्रदर्शित केले जाणार. हे खास शस्त्र बुलेटप्रुफ ग्लासमध्ये ठेवण्यात येणार असून त्यासाठी सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली आहे.

'वाघ नख' आणायला किती खर्च?

सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वाघ नखाच्या संभाव्य आगमनाबद्दल आनंद व्यक्त केला. मात्र खरे शस्त्र साताऱ्यातच असल्याचा इतिहासकारांचा दावा आहे. मात्र, मुनगंटीवार यांनी हे दावे फेटाळून लावत शस्त्र परत आणण्यासाठी झालेल्या खर्चाचे स्पष्टीकरण दिले. शस्त्र परत आणण्यासाठी १४.०८ लाख रुपये खर्च आल्याचे त्यांनी सांगितले.

लंडनमधील व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियमच्या अधिकाऱ्यांशी यशस्वी चर्चा झाली आणि त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेले शस्त्र भारतात परत आणण्याचा मार्ग मोकळा झाला, असेही सांस्कृतिक मंत्री म्हणाले. उदाहरणार्थ, या संभाषणानंतर लंडनच्या संग्रहालयाने एका वर्षाऐवजी तीन वर्षांसाठी 'वाघ नाख' सुपूर्द केला आहे.

# कर्नाटकात खाजगी उद्योगातही स्थानिकांना मिळणार आरक्षण

**बंगळुरू :** स्थानिक युवकांना अधिकाधिक प्रमाणात रोजगार उपलब्ध व्हावा यसाठी कर्नाटक सरकारने खाजगी क्षेत्रातही नोकऱ्यांमध्ये स्थानिक युवकांना आरक्षण देणारे मंत्रिमंडळाच्या बैठकीत संमत केले आहे. याचे कायद्यात रूपांतर झाल्यानंतर खाजगी उद्योगांना स्थानिक युवकांना नोकऱ्या देणे सक्तीचे ठरणार आहे.

कर्नाटक सरकारने मांडलेल्या या विधेयकात स्थानिक युवकांसाठी व्यवस्थापकीय पदांवर ५० टक्के तर अव्यवस्थापकीय, तृतीय आणि चतुर्थ श्रेणी पदांवर ७५ टक्के स्थानिक युवकांना नोकरी देणे खाजगी कंपन्यांसाठी बंधनकारक केले आहे. कायमस्वरूपी पदांबरोबरच कंत्राटी पद्धतीच्या आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या पदभरतीसाठीही हा नियम लागू राहणार आहे.

या आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी उमेदवाराचा जन्म कर्नाटकात झाला असावा अथवा त्याचा निवास किमान पंधरा वर्षापासून राज्यात असावा. त्याला कन्नड भाषा येत असावी. ज्या उमेदवारांकडे माध्यमिक शालत परीक्षेचे प्रमाणपत्र असणार नाही अशा उमेदवारांना आपली पात्रता सिद्ध करण्यासाठी निश्चित केलेली एक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### कोयनेला सौम्य भूकंप

**कराड :** कोयना परिसराला आज बुधवारी दुपारी ३ वाजून २८ मिनिटांनी भूकंपाचा सौम्य धक्का बसला. कोयना भुकंप वेधशाळेत या भूकंपाची तीव्रता २.८ रिश्टेर स्केल असल्याची नोंद झाली आहे.

विशेषतः पाटण व शिराळा तालुक्यातील काही भागासह पोफळी परिसरात हा भूकंप जाणवला. कोयना धरणस्थळावरील भूकंप वेधशाळेतील 'एमईक्यू-८००' या भूकंप मापन उपकरणावर या धक्क्याची नोंद झाली आहे. त्यानुसार या भूकंपाचा केंद्रबिंदू हेळवाक गावाच्या पश्चिमेला १३.६ किलोमीटरवर असून, त्याची खोली सुमारे १५ किलोमीटरवर आहे. भूकंपाचा हा धक्का सौम्य स्वरूपाचा असून, त्याने कोयना धरणाला कोणतीही इजा पोहचलेली नसल्याचे कोयना भूकंप वेधशाळा व्यवस्थापन प्रमुखांनी स्पष्ट केले आहे.

# अजित पवार यांच्यासाठी घराचे दरवाजे कायमचे उघडे पण...: शरद पवार यांची गुगली

**पुणे :** भारतीय जनता पक्षाच्या वळचणीला जाऊन बसलेल्या अजित पवार यांना पुन्हा पक्षात प्रवेश दिला जाणार नाही, असे आत्तापर्यंत सांगणाऱ्या शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर वेगळे विधान करून एकाच वेळी अजित पवार गटाचे कार्यकर्ते आणि भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व या दोघांमध्येही संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अजित पवार यांना आपल्या घराचे दरवाजे कायम उघडे आहेत. मात्र, परत पक्षात यायचे असेल तर त्याबाबतचा निर्णय मी एकटा नव्हे तर पक्ष घेईल, असे विधान पवार यांनी केले आहे.

पहाटेच्या शपथविधीला जाणाऱ्या अजित पवार यांना पक्षात परत घेऊन सण २०१९ मध्ये चूक केली. आता यावेळी मात्र त्यांच्यासाठी पक्षाचे दरवाजे कायमचे बंद आहेत, असे शरद पवार आणि त्यांच्याबरोबर एकनिष्ठ राहिलेले प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासारखे ज्येष्ठ सहकारी वारंवार सांगत आले आहेत. आज पत्रकारांशी बोलताना मात्र, शरद पवार यांचा सूर बदललेला होता. अजित पवार यांना पुन्हा पक्षात घ्यायचे असेल तर बंडानंतर आपल्याशी एकनिष्ठ राहिलेल्या सर्व सहकाऱ्यांशी विचार विनिमय करून त्याबाबत निर्णय घेतला जाईल. मी एकटा त्यावर निर्णय घेणार नाही, असे शरद पवार यांनी सांगितले.

शरद पवार यांनी राज्याच्या राजकारणात जातीवादाचे विष पेरले या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या आरोपाचा समाचार घेताना शरद पवार यांनी त्यांची खिल्ली उडवली. एखादी गोष्ट घडून गेल्यानंतर राज ठाकरे यांना सात आठ दिवसांनी किंवा महिन्या दोन महिन्यांनी जाग येते. त्यानंतर ते त्यावर काही विधान करतात. ज्याच्यावर विधान केल्यानंतर लोकांकडून प्रतिसाद मिळेल, अशांवरच ते बोलतात, असे पवार म्हणाले.

विधान परिषद निवडणुकीत शरद पवार यांनी पुरस्कृत केलेले उमेदवार जयंत पाटील यांचा पराभव झाला. त्याची कारणमीमांसाही पवार यांनी पत्रकारांसमोर मांडली. या निवडणुकीत महाविकास आघाडीतील कोणत्याही पक्षाने कोणत्याही पक्षाची फसवणूक केलेली नाही. मात्र, आपल्या पक्षाची बारा मते जयंत पाटील यांना जातील हे सांगतानाच काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाच्या मतांचा प्राधान्यक्रम कसा असावा, याबद्दल आपण काही आखणी केली होती. तसे झाले असते तर आमचे उमेदवार निवडून आले असते. मात्र, प्रत्येकाचा प्राधान्यक्रम वेगवेगळा ठरला आणि जयंत पाटील यांचा पराभव झाला, असे पवार यांनी सांगितले. विधान परिषद निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांनी एकत्र बसून उमेदवारीबद्दल चर्चा केली नव्हती. प्रत्येक पक्षाने आपापले संख्याबळ लक्षात घेऊन उमेदवार उभे केले, असेही ते म्हणाले.

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या विषयात सत्ताधाऱ्यांच्या विधानामुळे तणावात भर पडत असल्याचा आरोप पवार यांनी केला. सर्व पक्षांनी एकत्र येऊन याबाबतीत निर्णय घ्यावा यासाठी राज्यकर्त्यांनी विरोधकांना बैठकीसाठी पाचारण केले.

# राज्यात नवीन ५३ अपर तहसील कार्यालय

**फलटण :** राज्यातील काही तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेले नागरीकरण, वाढलेली लोकसंख्या, विकासात्मक कामे, जमिनींविषयक वाढते दावे आदी कारणांमुळे राज्यात नवीन ५३ अपर तहसील कार्यालय निर्मितीचे प्रस्ताव महसूल विभागाकडे दाखल झाले आहेत. याला मान्यता मिळाल्यास मोठ्या तालुक्यांचे विभाजन करून तेथे अपर तहसील कार्यालय स्थापन होणार आहे. त्याचबरोबर नागरिकांची गैरसोय दूर होणार असून कामे गतीने मार्गी लागतील. यामध्ये फलटण तालुक्यातील साखरवाडी येथे सुद्धा अपर तहसील कार्यालयाचा प्रस्ताव असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

शहरालगतच्या तालुक्यांमध्ये तसेच औद्योगिकीकरण झालेल्या तालुक्यातील महसूल अधिकाऱ्यांकडील कामे होण्यास वेळ लागतो. तसेच काही जिल्हा मुख्यालये आणि तालुक्यांची ठिकाणे भौगोलिकदृष्ट्या गैरसोयीची आहेत. महसूल कार्यालयांची फेररचना अथवा निर्मिती करण्याबाबत नागरिकांसह लोकप्रतिनिधींनीही शासनाकडे मागणी केली आहे.

महसूल कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल, निर्मिती ही खर्चिक व सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम करणारी बाब असल्याने याबाबत पूर्ण विचारांती अव अभ्यासांती निर्णय होणे आवश्यक आहे. म्हणून शासनाने एक समिती स्थापन केली. या समितीच्या बैठकाही झाल्या आहेत, अशी माहिती महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. या समितीच्या अहवालानंतर शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे.

# प्रकाश आंबेडकर यांची अजित पवारांना ऑफर

छत्रपती संभाजीनगर : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीतून बाहेर पडून वंचित बहुजन आघाडी सोबत यावे. आम्ही त्यांचे राजकीय वजन पुन्हा प्रस्थापित करू, अशी ऑफर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी पवार यांना दिली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आंबेडकर यांनी ही ऑफर दिल्याने अजित पवार गटाकडून त्याला काय प्रतिसाद देण्यात येतो. याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

वंचित बहुजन आघाडी नेहमीप्रमाणेच विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे सांगतानाच आंबेडकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे लोक महायुतीत आपल्याला वापरून घेतले जात असल्याचे सांगतात. वंचित बरोबर जाण्याची धमकी देतात. आम्हाला महायुती थांबवायचे असेल तर जागा वाढवून द्या, अशी मागणी करतात. अजित पवार यांनी खरोखरच आमच्या सोबत यावे, असे आवाहन आंबेडकर यांनी केले.


राजकीय पक्षांनी संवेदशील विषयांवर भूमिका घेणे आवश्यक आहे. मराठा आरक्षण आणि इतर मागावर्गीयांचे आरक्षण ह संवेदनशील विषय आहे.

# गडचिरोलीत आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई

### १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान

**गडचिरोली :** गडचिरोली पोलीस आणि माओवाद्यांमध्ये आज मोठी चकमक झाली. या चकमकीत १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलीस दलास यश आलं आहे. या कारवाईत पोलिसांकडून नक्षलवाद्यांकडील अनेक स्वयंचलित शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. छत्तीसगढ सीमेजवळील वांडोली गावात १२ ते १५ नक्षलवादी तळ ठोकून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. याच माहितीच्या पोलिसांकडून सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले होते. जवळपास सहा ते सात पोलीस आणि नक्षलवादी यांच्यात चकमक चालली. अखेर या कारवाईत आतापर्यंत १२ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना यश आल्याची माहिती समोर येत आहे.

या शोध अभियानात आतापर्यंत १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. तसेच आतापर्यंत ३ -घ४७, २ खछ्ड-ड, १ कार्बाइन, १ डड्ठ यासह ०७ ऑटोमोटिव्ह शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. मृत नक्षलवाद्यांपैकी एकांची ओळख पटली असून तो टिपागड दलमचा प्रभारी ऊत्तउच् लक्ष्मण आत्राम, विशाल आत्राम असल्याची



माहिती आहे.

या यशस्वी आणि मोठ्या अभियानासाठी सरकारकडून ३६० कमांडो आणि गडचिरोली पोलिसांना ५१ लाख रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. दरम्यान, या चकमकीत एक जवान जखमी झाला असून त्यांची प्रकृती धोक्याच्या बाहेर असल्याची देखील माहिती समोर येत आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी अखेर ८ व्या वेतन आयोगाचे प्रपोजल




**दर दहा वर्षांनी एक केंद्रीय वेतन आयोग स्थापन केला जातो. हा वेतन आयोग सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेचा, भत्त्यांचा, लाभांचा आढावा घेऊन महागाईच्या आधारे आवश्यक ते बदल सुचवतो. यानुसार सचिव शिवगोपाल मिश्रा यांनी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची मागणी केली आहे. यामुळे आगामी अर्थसंकल्पात ८ व्या वेतन आयोगाची घोषणा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या २३ जुलै रोजी देशाचा २०२४-२५ चा अर्थसंकल्प लोकसभेत सादर करणार आहेत. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोगाचा लाभ मिळण्याची घोषणा या अर्थसंकल्पातून होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारला आठव्या वेतन आयोगाचा प्रस्ताव मिळाला आहे. यात सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांचे विद्यमान वेतन, भत्ते आणि लाभांचा आढावा घेण्यात आला आहे. आगामी अर्थसंकल्पामध्ये या प्रस्तावाचा समावेश करावा यासाठी हा प्रस्ताव मोदी सरकारकडे पाठविण्यात आला आहे अशी माहिती समोर आली आहे.

६ जुलै रोजी केंद्रीय कर्मचारी आणि कामगारांच्या महासंघाने अर्थसंकल्प २०२४ पूर्वी आपल्या मागण्या मांडल्या आहेत. परंतु, आता पुन्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांनी कॅबिनेट सचिवांना पत्र लिहिले आहे. यात त्यांनी आपल्या मागण्यांचा प्रस्ताव मांडला आहे. यामध्ये आठवा वेतन आयोगाची स्थापना ही प्रमुख मागणी करण्यात आली आहे. केंद्रीय कर्मचारी राष्ट्रीय कर्मचारी आणि केंद्रीय कर्मचारी परिषदेसाठी संयुक्त सल्लागार यंत्रणेचे सचिव शिवगोपाल मिश्रा यांनी कॅबिनेट सचिवांना पत्र लिहिले आहे.

८ व्या वेतन आयोगाअंतर्गत कोणते मिळणार फायदे?

१ जानेवारी २०२६ पासून कर्मचाऱ्यांचे पगार आणि निवृत्तीवेतन सुधारण्यासाठी केंद्र सरकार पुढील वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार १० वर्षांनी नवीन वेतन आयोग लागू करत असते. ३१ डिसेंबर २०२५ रोजी ७ व्या वेतन आयोगाचा कार्यकाळ १० वर्षांचा होईल. हा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ८ वा वेतन आयोग लागू होईल.

केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगाराची गणना करण्यासाठी फिटमेंट फॅक्टर वापरला जातो. सध्या हा फिटमेंट फॅक्टर २.५७ इतका आहे. म्हणजे मूळ वेतन किमान वेतनाच्या २.५७ पट असेल. जर ८ व वेतन आयोग लागू झाला तर तो वाढून ३.६८ इतका होण्याची शक्यता आहे.

# मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो २४ जुलैपासून सुरु होणार

कुलाबा-वांद्रे-आरे दरम्यान मेट्रो ३ कॉरिडॉरचे काम २०१६ पासून सुरू आहे. आरेतील कारशेडच्या बांधकामाला झालेल्या विलंबामुळे मुंबईला अद्याप पहिली भूमिगत मेट्रो मिळू शकलेली नाही. मात्र आता लवकरच भूमिगत मेट्रो प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.

मुंबई शहर मेट्रो प्रकल्पांच्या जाळ्यांनी जोडले जाणार आहे. या दरम्यानच सर्वांच्या आकर्षण आणि उत्सुकतेचा विषय राहिलेली मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो २४ जुलै पासून सुरु होणार आहे. यासंदर्भात भाजप नेते विनोद तावडे यांनी एक्स पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे.

बहुप्रतिक्षीत मेट्रो ३ सुरु होण्याची वाट पाहत असलेल्या मुंबईकरांसाठी एक आनंदाची बातमी आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मेट्रो लाइन-३ कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्याची एकात्मिक

# मनपाच्या अधिकारी यांच्या ढिसाळ मनमानी कारभारामुळे ऐन पावसाळ्यात हडपसर मधील पाणी प्रश्न पेटला

**हडपसर :** हडपसर मधील माळवाडी भैरवनाथ चौक परिसरात नळाला कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने त्या भागातील नागरिक व महिला हडपसर क्षेत्रीय कार्यालयावर उपोषणास बसले असून ऐन पावसाळ्यात पिण्यास पाणी मिळत नसल्याने तसेच भैरवनाथ चौक परिसरात अनेक ठिकाणी मैलावाहिनी नादुरुस्त असल्याने फुटलेल्या चेंबर मधून मैलामिश्रित घाण पाणी रस्त्यावर वाहात असल्याने अशा विविध समस्या माळवाडी परिसरात उदभवल्याने तसेच आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने विविध समस्यांसाठी रस्त्यावर यावे लागले आहे.

मागील अनेक महिने झाले महापालिकेच्या भोंगळ कारभारामुळे व मनपा अधिका-याच्या मनमानीमुळे येथील भागातील समस्यां निर्माण झाल्या असल्याचे नागरिक सांगत आहेत.

पाणीपुरवठा अधिकारी ठिकठिकाणी झोन करुन ( वॉल) बसविल्याने एकाच भागात अनेक वॉल असल्याने प्रत्येक वॉलला एक तास पाणी सोडत असल्याने पाण्याचे नियोजन होत नाही ,कारण नागरीक वॉल फिरवत असल्याने पाण्याचा विस्कळीत पणा निर्माण होवून कोणाला पाणी मिळते तर कोणाला पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत .

मनपा प्रशासनाने पाण्याचे योग्य नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी नागरीक करीत आहेत.

उपोषणास स्थानिक नागरिक संतोष खरात यांच्या नेतृत्वात महिला मोठ्या संख्येने उपोषणास बसल्या होत्या , मनपा पाणीपुरवठा अधिकारी पोळ साहेब उपोषण स्थळी भेट देऊन समस्यां आठ दिवसाच्या आत सोडविल्या जातील असे सांगितले.स्थानिक आमदार चेतन तुपे हे उपोषण स्थळी भेट देऊन पाणीपुरवठा मनपा अधिकारी यांना बोलावून समस्या लवकर सोडवा असे सांगितले. पाणीपुरवठा अधिकारी पोळ यांनी आठ दिवसात प्रश्न मार्गी लावू असे सांगितले.

शेवटी आमदार चेतन तुपे यांच्या मध्यस्थीने नागरीकांनी उपोषण मागे घेत असल्याचे सांगितले.

उपोषणाला हडपसर आमदार चेतन तुपे,हडपसर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार हडपसर अध्यक्ष प्रवीण तुपे, माजी नगरसेवक मारुती आबा तूपे, अजित पवार गटाचे हडपसर अध्यक्ष डॉ.शंतनू जगदाळे, स्वीकृत माजी सदस्य दत्तात्रय तुपे, भुषण तुपे,रिपाइं हडपसर अध्यक्ष महादेव दंदी, गजेंद्र मोरे, महादेव कांबळे,मिनाज मेमन,हरपळेताई,आदींनी पाठिंबा दिला.

गेले पंधरा वर्ष हडपसर माळवाडी भागाचे प्रतिनिधीत्व करतो माळवाडी भागात कधी पाणी समस्या निर्माण झाली नाही, मनपाच्या ढिसाळ कारभार त्यात नगरसेवक माजी झाल्याने अधिकारी मनमानी करीत आहेत, या अगोदर फक्त तीन वॉल होते मनपा अधिकारी यांनी ५० ठिकाणी वॉल करून ठेवलेले आहेत. त्यामुळे कोणालाच पाणी मिळत नाही, अगोदर नियोजन चांगले होते आता अधिकारी यांनी नियोजन बिघडवले आहे. म्हणून आज लोकांना पाण्यासाठी रस्त्यावर

# केवळ चार महिन्यात देशात सत्तापालट : जयंत पाटील

**सातारा :** केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्या वेळी सरकार स्थापन झाले असले तरी केवळ चार महिन्यात केंद्रात सत्तापालट होईल आणि पृथ्वीराज चव्हाण केंद्रीय मंत्रिमडळात जातील. त्याचा फायदा महाराष्ट्राला होईल, असे उद्गार शेतकरी कामगार पक्षाचे सरचिणीस जयंत पाटील यांनी काढले.

लोकनेते विलासकाका उंडाळकर यांच्या पुतळ्याचे अनावरण आणि कोयना बँकेच्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन समारंभात जयंत पाटील बोलत होते. ज्या भूमीत यशवंतराव मोहिते यांनी आम्हाला मार्क्सवादाचे धडे दिले त्या भूमीत भाजपची विचारसरणी रुजत असल्याबद्दल खेद वाटतो, असेही ते म्हणाले. केंद्रातील सरकार केवळ चार महिने टिकणार असून त्यानंतर इंडिया आघाडीचे सरकार सत्तेवर येईल. पृथ्वीराज चव्हाण केंद्रीय मंत्री असतील. त्यांनी अनेक वर्ष दिल्लीत काम केले आहे. त्यांच्या अनुभवाचा महाराष्ट्राला फायदा होईल, असे पाटील यांनी नमूद केले. आपण इंडिया आघाडीचे घटक म्हणून हे बोलत आहोत, असेही त्यांनी आवर्जून स्पष्ट केले.

नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवणुकीत पाटील यांचा पराभव झाला आहे. त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने पुरस्कृत केले होते. ते सलग पाच कार्यकाळ अर्थात २४ वर्ष विधान परिषदेचे सदस्य राहिले आहेत. रायगड जिल्ह्यात त्यांची मोठी ताकद आहे. सर्वपक्षीय राजकारण्यांमध्ये पाटील यांना आदराचे स्थान आहे. त्यामुळेच त्यांनी केंद्र सरकारबाबत व्यक्त केलेल्या मताने राजकीय वर्तुळात

# आषाढी एकादशीचे औचित्य साधुन वळती शाळेतील शालेय विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा



**भोर :** वळती (ता. आंबेगांव ) येथील नरसिंह विद्यालय रांजणी , भागशाळा वळती, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वळती व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांनी आषाढी वारी निमित्त मंगळवारी (दि. १६ ) या दिवशी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले होते .पंढरपुर येथील आषाढी एकादशीचे औचित्य साधुन वळती शाळेतील शालेय विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा काढण्यात आला . या दिंडी सोहळ्यात अंगणवाडी ते दहावी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विठोबा रखुमाई, ज्ञानोबा, तुकाराम,मृदंग टाळांच्या गजरात माऊलींचा दिंडी सोहळा व मिरवणूक गावातून काढण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल व रुख्मिनी या दैवतांचे वारकरी पोशाख परिधान केला होता. डोक्यावर तुळशी वृंदावन घेतले होते. हातात पताका होत्या , त्यामागे माऊलींची पालखी होती. , माऊलीच्या पालखीचे दर्शन सर्वांनी घेतले, गावातील ग्रामस्थ दिंडी सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते.

यावेळी गावात मोठा रिंगण सोहळा पार पडला. या रिंगण सोहळ्याने गावातील ग्रामस्थांचे लक्ष वेधुन घेतले . प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी खास आकर्षक पालखी तयार केली होती. सर्व विद्यार्थ्यांनी रिंगण सोहळा उत्साहाच्या वातावरणात पाहिला. विठोबा - रखुमाई , ज्ञानोबा- तुकाराम, राम - कृष्ण- हरी च्या गजरात शालेय परिसर तसेच वळती गाव दणाणून गेला.विद्यार्थी,विद्यार्थिनी तसेच यावेळी ,शिक्षक, शिक्षिका यांनी फुगड्या खेळण्याचा आनंद घेतला .

यानंतर पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना गावापासुन जवळच प्रसिद्ध असलेल्या भार्गवराम मिंदीरात दर्शन घेऊन निसर्गरम्य परिसर पहाण्याचा आनंद घेतला . त्यानंतर विद्यार्थ्यांनी वनभोजनाचा आस्वाद घेतला .

या कार्यक्रमाचे नियोजन नरसिंह विद्यालय भागशाळा वळतीचे एम . एस . क्षीरसागर , जिल्हा परीषद शाळेचे मुख्याध्यापक विलास डोळस , अंगणवाडी सेविका मनिषा भागवत व त्यांचे सहकारी शिक्षकांनी केले.

# कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना जमिनीवर शिक्षण



**मुंबई :** आपल्याच मर्जीतील कंत्राटदाराला पालिकेची तिजोरी मोकळी करून देण्याच्या हेतूने पालिकेतील अधिकाऱ्यांनी मनमानी कारभार करत जो टेंडर घोटाळा केला आहे, त्यामुळे मुंबईतील पालिकेच्या अनेक शाळेतील विद्यार्थी जमिनीवर बसत आहेत. असा आरोप मुंबई काँग्रेस च्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेसच्या माजी नगरसेवकांनी मंगळवारी मुंबई काँग्रेस मुख्यालयात केला.

माहिती अधिकारात माहिती घेत या शिक्षण घोटाळ्या संदर्भात खा. वर्षा गायकवाड यांनी पालिका अधिकारी वर्गाची पोलखोल केली आहे. यावेळी बोलताना पालिकेचे माजी नगरसेवक मोहसीन हैदर म्हणाले की, पालिका शाळेत चार लाख मुले शिक्षण घेत आहेत. त्यांना कपडे, बॅग, पुस्तके, बेंच, असे शालेय उपयोगी साहित्य देण्यासाठी टेंडर काढले जाते. मात्र तांत्रिक मुद्दे पुढे करत काही अधिकारी टेंडर प्रक्रिया वेळकाढू व अधिक गुंतागुंतीची करून आपल्या मर्जीतील कंत्राट दाराला कंत्राट कसे मिळेल याची व्यवस्था करत असल्याने तेच तेच ठेकेदार नाव बदलून कंत्राट मिळवत आहेत. याप्रकरणी सर्व पुरावे सरकारला दिले आहेत अशी माहिती माजी नगरसेवक अश्रफ आझमी यांनी दिली. यावेळी प्रवक्ते युवराज मोहिते, संदीप शुक्ला, सुरेशचंद्र राजहंस आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शिक्षक भरती नसल्याने शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. जे शिक्षक आहेत गांभीर्याने लक्ष देत नाहीत. या सर्व मनमानी प्रकारविरिधत मुंबई काँग्रेस आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी दिला.

# चंद्रावर आढळली प्रचंड आकाराची गुहा

**नवी दिल्ली :** इटलीतील संशोधकांच्या गटाने चंद्रावर एक भव्य गुहा शोधून काढली आहे. ही गुहा भविष्यकाळात अंतराळवीरांचे निवासस्थान होऊ शकते. अमेरिकेची अंतरिक्ष विज्ञान संस्था नासा ही चंद्रावर मानवासाठी दीर्घकालीन रहिवास विकसित करण्याच्या प्रयत्नात आहे. चंद्रावर अशा प्रकारच्या अनेक गुहा असण्याची शक्यताही वैज्ञानिकांनी व्यक्त केली आहे.

ट्रेंटो विद्यापीठाचे संशोधक के लॉरेंजो ब्रूझोन आणि लिओनार्डो केरर यांनी रडारच्या मदतीने ही गुहा शोधली आहे. ही गुहा आकाराने एवढी भव्य आहे की चंद्राच्या पृष्ठभागावरून ती कोणत्याही उपकरणाची मदत न घेता दृष्टिक्षेपात येऊ शकते. चंद्रावर पहिले मानवी पाऊल ठेवणारे अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग आणि बझ एल्ड्रिन यांचे अंतराळ यान चंद्रावर ज्या ठिकाणी उतरले होते त्या ठिकाणापासून ४०० किलोमीटर अंतरावर ही गुहा आहे.

# संजय राऊत यांनी केली अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी

**मुंबई :** देशाचे दुश्मन मोकाट असून दहशतवाद्यांनी जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दल जवानांच्या हत्यांचे सत्र आरंभले आहे. देशाचे गृहमंत्री अमित शहा मात्र धमक्या देणे, निवडणुका आणि इतर उद्योगात व्यस्त आहेत. गृहमंत्री म्हणून आलेल्या अपयशाची चाड असेल, जराशी तरी लाज वाटत असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा.

अन्यथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्यावेळी तिसऱ्यांदा शपथ घेत होते त्यावेळी देखील दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या जवानांचे प्राण घेतले. या संहाराला केंद्र सरकार जबाबदार आहे. गृहमंत्री अमित शहा यांना मागील पाच वर्षात काहीही करता आले नाही. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे देखील कोणतीही कारवाई करत नाहीत. मोदी सरकार तिसऱ्या वेळा सत्तेत आल्यापासून तब्बल ४० जवानांचा बळी दहशतवाद्यांनी घेतला आहे.

**तर एवढे बळी जाताना पहावे लागले नसते**

अमित शहा हे देशाच्या दुश्मनांपेक्षा आपल्या राजकीय विरोधकांना दुश्मन मानतात. राजकीय विरोधकांना संपविण्यासाठी अमित शहा यांनी जेवढी ताकद वापरली तेवढी ताकद जर देशाच्या दुश्मनांविरुद्ध मणिपूर आणि जम्मू कश्मीर मध्ये वापरली असती तर भारतीय जवानांचे एवढे बळी जाताना पहावे लागले नसते, असेही राऊत म्हणाले.

# आगामी विधानसभा निवडणूक मराठा आणि ओबीसी यांच्यातच' ओबीसींचा विजय निश्चित असल्याचा प्रकाश शेंडगे

सांगली: आगामी विधानसभा निवडणूक मराठा आणि इतर मागासवर्गीय समाज यांच्यातच लढविली जाणार असून त्यात संख्याबळाच्या आधारावर आम्हीच विजय प्राप्त करू, असा दावा इतर मागावर्गीयांचे नेते प्रकाश शेंडगे यांनी केला. विधानसभा निवडणुकीसंदर्भात इतर मागावर्गीय समाजाची भूमिका निश्चित करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात ते बोलत होते.

ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे आणि सगे सोयऱ्यांच्या अध्यादेशाची अंमलबजावणी करण्यात यावी, यासाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरागे पाटील यांनी सरकारला दिलेली मुदत संपुष्टात आली आहे. आपल्या मागण्यांसाठी २० तारखेपासून पुन्हा उपोषण सुरू करण्याचा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. दुसरीकडे ओबीसी समाजानेही मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण नको या मागणीसाठी आरक्षण बचाव आंदोलनाची हाक दिली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीला जेमतेम १०० दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. आपल्या मागण्या पूर्ण न झाल्यास या निवडणुकीत सर्व २८८ जागांवर आपला उमेदवार उभा करण्याचा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. त्यावर जरांगे पाटील जर त्यांचे उमेदवार उभे करणार असतील तर आम्ही देखील आमचे उमेदवार उभे करू, असे प्रतिआव्हान शेंडगे यांनी यापूर्वीच दिले आहे. त्यासाठी तब्बल २०० जागांवर आपले सर्वेक्षण पूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले होते.

या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या ओबीसी मेळाव्यात आगामी विधानसभा निवडणुकीत समाज ओबीसी म्हणून प्रत्यक्षपणे सहभागी होणार असल्याचे शेंडगे यांनी सूचित केले. इतर मागास प्रवर्गात मोडणाऱ्या जातींची लोकसंख्या तब्बल ६० टक्के आहे. दलित आणि मुस्लिम समाज बरोबर आला तर ती ८० टक्के पर्यंत जाते. त्यामुळे संख्याबळाचा विचार करता या निवडणुकीत आपला विजय निश्चित आहे, असा दावा शेंडगे यांनी केला. यानंतर लवकरच पुन्हा एक भव्य मेळावा घेऊन निवडणूक लढविण्यासंदर्भात ठोस निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# उत्तरप्रदेशचा फॉर्म्युला आता महाराष्ट्रातही, समाजवादी पार्टीच्या खासदारांची मुंबईत बैठक




**मुंबई :** सर्वात जास्त खासदार निवडणुकीत जिंकून आलेले उत्तरप्रदेश हे राज्य तिसऱ्या क्रमांकावर आहे. या राज्यात समाजवादी पार्टीच्या करिष्म्याने मोदी सरकारला धक्का दिला. उत्तर प्रदेश मध्ये समाजवादी पार्टीने जे काही केले ते महाराष्ट्रात आगामी निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर राबविण्यासाठी व सर्व तयारीने निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्यासाठी या सर्व ३७ खासदारांची बैठक मुंबईत होत आहे.

याबाबतची माहिती समाजवादी पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आबु आसिम आझमी यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आझमी म्हणाले, महाराष्ट्रात आगामी निवडणुका लढविण्यासाठी सपा ने २७ जुलै रोजी रंगशारदा सभागृहात एका बैठकीचे आयोजन केले आहे. उत्तर प्रदेश मध्ये जो करिश्मा आमच्या पार्टीने दाखवला तोच आता महाराष्ट्रातही दाखवणार. उत्तर प्रदेश मधील जनता मुंबईत मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे या बैठकीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.असे आमदार रईस शेख म्हणाले. यावेळी पार्टीचे प्रमुख महासचिव मेराज सिद्धकी व इतर पदाधिकारी उपस्थित होते. सर्वधर्म समभाव हे वाक्य मोदी सरकार विसरले असल्याने त्यांना ४०० पार चा आकडा गाठता आला नाही. जात धर्म यापलीकडे जाऊन माणूस म्हणून काहीतरी भूमिका घ्या. नाहीतर भविष्यात भाजपला खुप अवघड जाईल. गड किल्ल्यांवर होणारे अतिक्रमण किंव्हा इतर कोणत्याही ठिकाणी होत असलेले अतिक्रमण हे चुकीचे आहे.

# शाश्वत सुखाचा आनंद भक्तीमय सोहळ्यातून मिळतो : डॉ. प्रिया शिंदे

## गौरीशंकर सनशाईन इंग्लिश मीडियम स्कूल खटाव येथे वारकरी दिंडी सोहळा उत्साहात संपन्न

**खटाव :** शाश्वत सुखाचा खरा आनंद भक्तीमय सोहळ्यातून प्राप्त होतो असे मत डॉ. प्रिया महेश शिंदे यांनी व्यक्त केले त्या गौरीशंकरच्या सनशाईन इग्लिश मीडियम स्कूल खटाव ने आयोजित केलेल्या आषाढी वारकरी दिंडी सोहळ्याच्या पालखी पूजन प्रसंगी बोलत होत्या.

यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रतिभा भराडे, प्राचार्या प्रमिला टकले, आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. प्रिया शिंदे पुढे म्हणाल्या की वारकरी परंपरेची शिकवण सामाजिक ऐक्य एकात्मतेला पूरक ठरणारी आहे.

यावेळी स्कूलचे विद्यार्थी विठुराया व रुक्माईच्या वेशभूषेत विठ्ठल नामाचा जयघोषात सामील झाले होते ढोल ताशा व लेझीम तालासुरात संपूर्ण खटाव मधून वारकरी दिंडी काढून संपूर्ण खटाव भक्तीमय केले ठीक ठिकाणी या वारकरी दिंडीचे ग्रामस्थांनी स्वागत केले.

दिंडी सोहळ्यातील सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मदनराव जगताप, उपाध्यक्ष मिलिंद जगताप, संचालक डॉ अनिरुद्ध जगताप, जयवंतराव साळुंखे, आप्पा राजगे, प्रशासकीय अधिकारी नितीन मुङलगीकर, जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांनी कौतुक केले.

# जिल्ह्यातील पहिल्या स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र व शाळेचे १५ ऑगस्ट रोजी लोकार्पण

## पालकमंत्री शंभूराजे देसाई यांची माहिती, मॉडेल योजना राज्यस्तरावर राबवणार



**सातारा :** सातारा जिल्ह्यातील सव्वादोनशे शाळा व सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र ही मूलभूत सुविधांनी स्मार्ट बनवण्यात येणार आहेत. याकरिता १५० कोटीचा आराखडा बनवण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातील पहिल्या स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र व शाळेचे लोकार्पण १५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत केले जाणार आहे अशी माहिती पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेवटच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार महेश शिंदे, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार पृथ्वीराज चव्हाण, आमदार जयकुमार गोरे, आमदार शशिकांत शिंदे, माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते, पाटील, निमंत्रित सदस्य मनोजदादा घोरपडे, पुरूषोत्तम जाधव जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख इत्यादी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री शंभूराज देसाई बोलताना पुढे म्हणाले सातारा जिल्ह्याच्या विकासासाठी ५७५ कोटीच्या आराखड्याला वित्त विभागाने मानता दिली असून त्याचा पहिला टप्पा १९१ कोटीचा जिल्ह्याला खर्च करण्यासाठी प्राप्त झालेला आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये सातारा जिल्हा प्रशासनाने सव्वाशे कोटीच्या प्रशासकीय मान्यता दिला असून त्या कामांना सुरुवात झालेली आहे महाराष्ट्रामध्ये पहिल्या तीन महिन्यात इतक्या प्रशासकीय मान्यता देणारा सातारा जिल्हा पहिलाच ठरला आहे वाढीव निधीच्या संदर्भात जिल्हा प्रशासनाला १३८ कोटीचा जादा निधी खर्च करायला मिळणार आहे त्याचेही इस्टिमेट केले जात असून एकूण आराखड्याच्या १५० कोटी रुपये स्मार्ट स्कूल व स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र बनवण्यासाठी खर्च केले जाणार आहे याचा आराखडा तयार करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केला जाणार आहे येत्या १५ ऑगस्ट रोजी पहिले स्मार्ट स्कूल व प्राथमिक आरोग्य केंद्र तयार करून त्याचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत केले जाणार असल्याचे शंभूराज देसाई यांनी सांगितले हा प्रकल्प मॉडेल स्तरावर स्वीकारण्यात आला असून साताऱ्याचे हे मॉडेल संपूर्ण राज्यस्तरावर राबवले जाणार असल्यास संदर्भात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सूचना केलेली आहे असे त्यांनी स्पष्ट केले माण तालुक्यातील निकृष्ट दर्जाची बंधार्यांची कामे लघुपाटबंधारेच्या विभागाकडून झालेली आहेत जिल्हा परिषदेने प्राथमिक स्वरूपात चार पैकी तीन बंधाऱ्यांची चौकशी केली असता ती निकृष्ट दर्जाची आढळून आलेली आहेत असे असतानाही येथील बंधाऱ्यांची बिले काढण्यात आली यासंदर्भात राज्यस्तरीय गुणात्मक दर्जा व नियंत्रण विभागातर्फे याची उच्चस्तरीय चौकशी केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आमदार जयकुमार गोरे यांनी मागील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्याची तक्रार केली होती.

याशिवाय लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री तीर्थाटन योजना महिला गृहिणींना वर्षातून तीन गॅस मोफत इत्यादी योजनांचा आढावा घेण्यात आला यासंदर्भात आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी राज्य सरकारचा अभिनंदन मांडला त्याला आमदार बाळासाहेब पाटील यांनी अनुमोदन दिले तसेच दोन वर्षांपूर्वी पाटण तालुक्यात अतिवृष्टीने बाधित झालेल्या मिरगाव आंबेघर येथील नागरिकांची कोयना नगर येथील इरिगेशन कॉलनीमध्ये स्थलांतर करण्यात आले आहे राज्य शासनाने या संदर्भात चार एकर जागा विकत घेतली असून ५५० घरांच्या बांधकामाचे १८५ कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले आहे ही कामे लवकरच सुरू करून पुढील आठ महिन्यात पूर्ण करणार असल्याचे शंभूराजे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले याशिवाय येत्या १९ जानेवारी रोजी शिवकालीन ऐतिहासिक वाघ नखांचे सातारा जिल्ह्यात आगमन होत आहेत ही वाघ नखे छत्रपती शिवाजी संग्रहालयात ठेवली जाणार आहेत त्याकरिता हा परिसर अतिक्रमण मुक्त ठेवणार असून येथे कोणतेही चुकीचे बांधकाम खपवून घेतले जाणार नाही असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902


# सातारा जिल्ह्यात आषाढी एकादशी आणि मोहरम उत्साहात साजरा

## सातारा शहरातील मानाच्या जंगी ताबूतची मिरवणूक

**सातारा :** दरवर्षी देवशयनी एकादशी अर्थात आषाढ शुद्ध एकादशीला हिंदू धर्माचा चातुर्मास मोठ्या उत्साहात प्रारंभ होतो .आज बुधवार आषाढ शुद्ध एकादशीला या चार्तुमास कार्यक्रमाला विविध धार्मिक उपक्रमांनी सुरुवात झाली. त्यातच आषाढ शुद्ध एकादशीला वर्षातील सर्वात मोठी एकादशी म्हणून अनेक वैष्णव भक्त हे उपवासाचे व्रत करतात. सातारा जिल्ह्यातही आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली .त्यातच यावर्षी मुस्लिम समाज, धर्माचा मोहरम हा सण मोठ्या भक्ती पूर्ण वातावरणात तसेच सातारा शहरातील मानाच्या जंगी ताबूत ची मिरवणूक काढून साजरा करण्यात आला.

यानिमित्त सामुदायिक प्रार्थना ही विविध मशिदीत तसेच ईदगाह मैदानांवर मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली. गेले दोन दिवस मुस्लिम धर्माच्या वतीने या ताबूच्या दर्शनासाठी सातारा शहरातील मंगळवार पेठेतील जंगी वाडा येथे मुस्लिम भक्तांनी गर्दी केली होती. तसेच नवसाचे वाघ अर्थात अंगावर चट्टे, पट्टे आओढून नवस बोललेल्या मुलांच्या वाजत गाजत मिरवणूक काही काढण्यात आल्या होत्या.





आषाढी एकादशी निमित्त सातारा शहरातील मंगळवार पेठ येथील श्री गवई विठ्ठल मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठी दिवसभर तसेच रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती. या मंदिराला एकादशी निमित्त केलेली विद्युत रोषणाई विशेष लक्ष वेधून घेत होती .

बुधवारी पहाटे मंदिराचे विश्वस्त आणि मालक संतोष गवई यांच्या हस्ते सपत्नीक विठ्ठलाची षोडशोपचार महापूजा करण्यात आली .आकर्षक फुलांनी सजवलेल्या गाभाऱ्यामध्ये त्यानंतर विठ्ठल रुक्मिणीला अलंकार युक्त पोशाख घालण्यात आले .महाआरती केल्यानंतर दर्शनासाठी दिवसभर सातारकरांनी मोठ्या रांगा लावल्या होत्या दुपारी व्यंकटपुरा पेठ महिला भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला .आषाढी एकादशीचे औचित्य साधून या मंदिर परिसरामध्ये सातारा शहरातील अक्षय ब्लड बँकेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात युवा वर्गाने मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन रक्तदानाचा सामाजिक उपक्रम पार पाडला. शहरातील राजवाडा परिसरात अनेक व्यापारी बंधूंनी वैष्णव भक्तांसाठी उपवासाच्या खिचडीचा प्रसाद मोफत स्वरूपात मोठ्या प्रमाणात वितरित केला.

शहरातील यादोगोपाळ पेठेतील गोल मारुती मंदिरांजीच्या घाटगे विठ्ठल मंदिरात आज सकाळी विठ्ठलाची महापूजा करून विठ्ठलाला आकर्षक पगडी घालून फुलांची आरास करण्यात आली होती .

दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या सातारा शहरा नजीकच्या संगम माहुली येथील राही - रुक्मिणी विठ्ठल मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती .खणआळी परिसरातील संत नामदेव मंदिर सोमवार पेठेतील संत ज्ञानेश्वर मंदिर ,यादोगोपाळ पेठेतील श्री दिवशीकर बंधू यांच्या श्री मुरलीधर मंदिरात ही विशेष पूजा करण्यात आली होती. तसेच फुलांचे हार आणि मंदिर सुशोभित करण्यात आले होते.सातारा शहरातील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिरातील राधाकृष्ण मंदिरातही विशेष पूजा तसेच प्रसादाचे वितरण करण्यात आले. सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यातील प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या करहर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातही दर्शनासाठी भाविकांनी प्रचंड मोठ्या लांबच लांब रांगा लावल्या होत्या. करहर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आज पहाटे सातारा व जावली तालुक्याचे आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले व आमदार शशिकांत शिंदे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली त्यानंतर दर्शणार्थींनी देवाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होतीयावेळी मंदिर व्यवस्थापनाचे वतीने सर्व भक्तांना प्रसाद वितरित करण्यात आला रात्री उशिरापर्यंत विविध विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये भजन, कीर्तन, प्रवचन तसेच धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून हरिजागर तसेच मंत्रजागर करण्यात आला .अनेक मंदिरांमध्ये उपवासाची खिचडीचे पदार्थ तसेच राजगिरा लाडू प्रसाद म्हणून वितरित करण्यात आले होते. मंदिराबाहेर तुळशी, बुक्क, विविध सुवासिक फुले यांच्या विक्रीचे स्टॉल उभारण्यात आले होते सातारा शहरातील अनेक मिठाई विक्रेत्यांकडे एकादशीच्या उपवासासाठी लागणारे फराळाचे पदार्थ खरेदीसाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.

## / गुन्हे वृत्त... /

### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

सातारा : गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १५ रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास विनायक गुलाबराव करंजरक रा. झरेवाडी, पोस्ट हुमगाव, ता. जावली, जि. सातारा. सध्या रा. दत्तनगर, कोडोली, सातारा यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत.

### विनापरवाना आंदोलन केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : विनापरवाना आंदोलन केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, संदीप वामन जाधव रा. पर्णकुटी, मु. पो. तांदुळवाडी, ता. कोरेगाव, जि. सातारा यांनी दि. १५ रोजी अडीच वाजण्याच्या सुमारास कोणतीही परवानगी न घेता जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे आंदोलन केले. याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार मोरे करीत आहेत.

### मारहाण प्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : मारहाण करून एकास जखमी केल्याप्रकरणी एका विरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १२ रोजी दुपारी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अमित गौतम खांडेकर रा. सैदापूर, ता. सातारा हे दुपारचे जेवण करण्यासाठी मित्रांसह सैदापूर येथीलच हॉटेल गावठी येथे जेवणासाठी गेले होते. त्यावेळी काही कारण नसताना केडी उर्फ अर्जुन इंगळे रा. सैदापूर, ता. सातारा याने खांडेकर यांच्या डोक्यात दारूची बाटली मारून त्यांना जखमी केले. अधिक तपास पोलीस हवालदार एम.डी. चव्हाण करीत आहेत.

### अपहरण प्रकरणी चार अज्ञातांवर गुन्हा

सातारा : दोघांचे अपहरण तसेच मारहाण करून त्यांना जखमी केल्याप्रकरणी चार अज्ञातांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ओंकार श्रीकृष्ण चव्हाण (वय २३, रा. कामठी पो.वेळे ता.सातारा) या युवकाने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ही घटना दि. १४ जुलै रोजी लिंब ता.सातारा व सातार्यातील पोवई नाका येथे घडली आहे. तक्रारदार ओंकार चव्हाण व रोहित मोरे हे मित्र आहेत. रोहित मोरे याचे सुरुवातीला लिंब तर ओंकार याचे पोवई नाका येथून अज्ञात चौघांनी कारमधून आलेल्यांनी अपहरण केले. अपहरण केल्यानंतर संशयित अनोळखी चौघांनी म्हसवे ता.सातारा गावच्या हद्दीत नेले. तेथे कार थांबवून 'तुम्ही दोघे विवाह नोंदणीसाठी साक्षीदार का झाला,' असे म्हणत लाकडी दांडक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच इतर संशयितांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ, दमदाटी केली. तसेच संशयितांनी दोघांना जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर संशयितांनी तेथून पळ काढला.

जखमी दोघा मित्रांनी उपचार घेवून पोलिस ठाण्यात घडलेल्या घटनेची माहिती दिली. त्यावरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. संशयित हल्लेखोरांच्या शोधासाठी पोलिस रवाना झाले आहेत.

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा

सातारा : विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह चौघांविरुद्ध सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, जानेवारी ते ६ जुलै २०२४ दरम्यान प्रज्ञा ऋषिकेश माने रा. देगाव, ता. सातारा हिचा छळ केल्याप्रकरणी तिने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत सातारा तालुका पोलीस ठाण्यात पती ऋषिकेश भागवत माने, सासू माधवी भागवत माने, सासरे भागवत गणपत माने, नणंद देवकी भागवत माने यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अभिजीत गुरव करीत आहेत.

### वृध्देला मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा

सातारा : वृध्देला मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरोधात सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बाथरुममध्ये कशाला जाताय, या कारणातून तिघांनी वृध्देला मारहाण केल्याप्रकरणी सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कमल बबन माने (वय ७५, रा. म्हसवे ता.सातारा) यांनी विजय माने, प्रियांका जाधव, रेखा माने यांच्या विरुध्द तक्रार दिली आहे. ही घटना दि. १३ जुलै रोजी म्हसवे येथे घडली आहे. संशयितांनी कळकाच्या दांडक्याने मारहाण केले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### भाजी मंडई येथून दुचाकीची चोरी

सातारा : भाजी मंडई येथून दुचाकीची चोरी केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सेव्हन स्टार इमारतीसमोरील भाजी मंडई येथून अज्ञात चोरट्याने एमएच ११ एटी ९६५३ या क्रमांकाची दुचाकी चोरुन नेली. ही घटना दि. १५ जुलै रोजी घडली आहे. याप्रकरणी साहील दादासाहेब गायकवाड (वय २२, रा. पाली ता.कराड) यांनी शाहूपुरी पोलिस

## वकिल्याच्या कानशिलात मारली वाई वकील संघ आक्रमक पोलीस ठाण्यावर मोर्चा

वाई : पुणे ग्रामीण पोलिसच्या एका महिला शिपायाने दुचाकी काढण्याच्या कारणास्तव वाईतील वकिलाच्या कानशिलात मारली.यामुळे वकील संघ आक्रमक झाला. काम बंद आंदोलन करत वकील संघाने पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला.

वाई पोलीस ठाण्यात कामासाठी आलेल्या पुणे ग्रामीणच्या महिला पोलीस शिपायाने पोलीस ठाण्यासमोर लावलेली दुचाकी काढण्याच्या कारणास्तव वकीलाच्या कानशीरात मारली. वकील संघाने य घटनेचा निषेध केला आहे. या घटनेत पोलिसात संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्यांची तक्रार दाखल केली.वकिल संघटनेने यासंदर्भात निषेध मोर्चा काढून वाईतील सर्व न्यायाधिश, तहसीलदार, पोलीस निरीक्षक व प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिले. वाईतील वकील योगेश संपत जमदाडे यांच्याबाबत हा प्रकार १२ जुलै रोजी वाई पोलस ठाण्याच्या गेटलगत घडला.

पोलीस ठाण्याच्या आवारात असलेले दुचाकी वाहन काढण्याच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादावादीत महिला पोलिस कर्मचारी ऐश्वर्या बाचल यांनी जमदाडे यांच्या कानशिलात लगावली. जमदाडे यांनी या घटनेसंदर्भात वाई पोलिसांकडे तक्रार देण्याचा प्रयत्न केला, मात्र ठाणे अंमलदारांनी संबंधित महिला पोलिस कर्मचाऱ्यालाच मदत करण्याच्या हेतूने चुकीच्या पध्दतीने वकीलांना वागणूक दिली व त्यांच्या सांगण्याप्रमाणे तक्रार नोंदवून घेतली नाही. उलट महिला पोलीस अंमलदारांनी संबंधित महिला कर्मचाऱ्यांच्या सांगण्यानुसार वकिलांच्या विरोधात खोटी तक्रार दाखल करून घेतली असाही आरोप वकील संघटनेने केला आहे. आज वकील संघाने काम बंद आंदोलन करत पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला यात सर्व सदस्य सहभागी झाले होते.

दरम्यान या कारणावरून संघटनेचे अध्यक्ष रविंद्र भोसले यांनी निषेध व्यक्त केला असून ड उमेश सणस जगदीश पाटणे भारती कोरवाल यांनी महिला पोलीस शिपायावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे तहसीलदार सोनाली मिटकरी यांनी निवेदन स्वीकारले.

### आदर्श माध्यमिक विद्यालय पेटेश्वर नगरचा पालखी दिंडी सोहळा मोठा उत्साहात

**कास पठार :** जागतिक वारसा स्थळ असलेले कास पठार आणि या कास पठारावर माध्यमिक शिक्षणाची सोय असणार्या आदर्श माध्यमिक विद्यालय या विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा पायी दिंडी सोहळा हायस्कूल ते विठ्ठल ज्ञानेश्वर माऊली मंदिर पेट्री यादरम्यान मोठ्या उत्साहात संपन्न झाला

आपला महाराष्ट्र ही संतांची भूमी आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्रातून विविध दिंड्या पंढरपूरला जात असतात कास पठार भागातून सुद्धा हजारो वारकरी या दिंडी सोहळ्यामध्ये सामील होतात याचेच औचित्य साधून पेटेश्वर शिक्षण संस्थेच्या आदर्श माध्यमिक विद्यालया मध्ये पायी पालखी दिंडी सोहळा आयोजित केला होता यावेळी विद्यार्थ्यांनी हरिनामाचा गजर करत जवळजवळ तीन ते चार किलोमीटर पायी वारी करून विठू माऊलीचे दर्शन घेतले.

## मसूर नजीक कांबिरवाडी फाट्यावर चोरट्यांनी दोन दुकाने फोडली

**मसूर :** मसूरनजीक मसूर-उंब्रज रोडवर कांबिरवाडी फाट्यावरील दोन दुकाने अज्ञात चोरट्यानी फोडून सुमारे ७५ ते ८० हजाराचा मुद्देमाल व रोख रक्कम लंपास केला. फाट्यावरील हर्षवर्धन कृषी सेवा केंद्रातील सीसीटीव्ही कॅमेरा हार्ड डिस्कसह गायब केला. हा चोरीचा प्रकार शनिवारी साडेबारा ते दीडच्या सुमारास घडला. व्यावसायिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. कांबिरवाडी ग्रामपंचायतीने या फाट्यावर विजेची व्यवस्था करावी अशी मागणी व्यावसायिकांनी केली आहे.

कांबिरवाडी फाट्यावर शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख तात्यासाहेब घाडगे यांच्या मालकीचे व्यापारी गाळे आहेत. त्यापैकी दोन गाळ्यामध्ये सागर घाडगे यांचे हर्षवर्धन कृषी सेवा केंद्र आहे. या कृषी दुकानाचे हायड्रोलिक गॅसच्या सहाय्याने शटर उचकटून गल्ल्यातील रोख रक्कम तीन हजार व कृषी औषधे मुद्देमाल मिळून सुमारे ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. सुमारे ५० ते ६० हजार रुपयांची महागडी शेतीमालाच्या औषधासह सीसीटीव्ही कॅमेरा व हार्डडिस्कही चोरट्यांनी गायब केली आहे. या दुकानच्या शेजारीच असलेल्या कवठे येथील शिंदे बंधू यांच्या स्वामीतीर्थ बासुंदी चहा व कोल्ड्रिंक्स या दुकानाची दोन कुलपे तोडून चिल्लर व बेकरी माल लंपास केला. या दुकानांच्या काही अंतरावर असलेल्या रामदेव स्टील या दुकानाचेही शटर्स उच कटण्याचा असफल प्रयत्न चोरट्यानी केला. हर्षवर्धन कृषी सेवा केंद्रातील ड्रॉवरमधून चोरट्यानी चिल्लरसह तीन हजार रुपयाच्या नोटा काढून घेतल्या. पलायनाच्या नादात चिल्लर टेबलवरच सोडून गेले.

## सायली लेंभे हिचे सी.ए.परीक्षेत यश

**कोरेगाव :** पिंपोडे बुद्रुक (ता.कोरेगाव) येथील सायली दीपक लेंभे हिने में २०२४ मध्ये झालेल्या सी.ए. सनदी लेखपाल परिक्षेत यश मिळवले आहे.

जिद्द, चिकाटी, परिश्रम या गुणांवर यश संपादन केले. शालेय जीवनात इयत्ता ४ थी ते ७ वी ची स्कॉलरशिप परिक्षेत यश मिळवले होते. तसेच रयत शिक्षण संस्थेचे निवासी गुरुकूल प्रकल्प सयाजीराव महाविद्यालय सातारा येथे ८ वी१० पर्यंत शिक्षण झाले. सी.ए.यश मिळवल्याबद्दल



सायली लेंभे (जगताप) हिचे पिंपोडे बुद्रुक, पाटखळ येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन केले.

## माण तालुक्यातील निकृष्ट बंधाऱ्याची फेरचौकशी होणार

### डीपीसीच्या बैठकीत पालकमंत्री शंभूराज देसाई यांचे आदेश, आमदार जयकुमार गोरे यांचा पाठपुरावा

**सातारा :** जानेवारी महिन्यात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये माण-खटाव मतदार संघातील जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाने केलेली कामे निकृष्ट दर्जाची झाली होती. त्या कामांच्याबाबत मी आवाज उठवला होता. त्यावेळी त्या कामांची चौकशी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सीईओ यांच्यामार्फत चौकशी सुरू होती. त्यावेळी प्राथमिक चार बंधाऱ्यांची चौकशी केली होती त्यामध्ये तीन बंधाऱ्यांच्या कामांमध्ये दोषी आढळले होते. या प्रकरणाची आता जलसंधारण विभागाच्या राज्यस्तरीय समितीकडून फेरचौकशी करण्याचे आदेश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले आहेत.

याची माहिती आमदार जयकुमार गोरे यांनी डीपीसीच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिली गोरे पुढे म्हणाले अहवाल सादर करण्यात आला. तेव्हा जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाचे अधिकाऱ्यांना अभय देण्याचा प्रयत्न केला गेला. ज्या अधिकाऱ्यांचा संबंध नाही



त्याच अधिकाऱ्यावर कारवाई प्रस्तावित केली. हे फार गंभीर पध्दतीचे प्रकरण आहे. ज्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला चौकशी चालू असतानाच जिल्हा परिषदेकडून या कामांची बिले निघाली असा प्रकार यावेळी घडला आणि अगोदर झालेल्या कोट्यावधीच्या कामांची बिल काढण्यासाठी आर्थिक तडजोड झाली असावी. याविषयी बरीच चर्चा झाली बिले का काढली ? कशी काढली याचा सुद्धा निर्णय झाला. या कामांची तपासणी क्वालिटी कंट्रोल विभागाकडून करण्यात यावी परंतु आजपर्यंत कोणत्याही कामाचा क्वालिटी कंट्रोलचा रिपोर्ट हा कंत्राटदाराच्या विरुद्ध गेलाच नाही. असा साधारणतः निष्कर्ष आहे.

यासर्व प्रकरणात जिल्हा परिषदेतील लघुपाटबंधारे विभागाचे दिलपाक जोशी हे दोषी आहेत या कामांमध्ये प्रथमदर्शनी दोष आढळून येत आहेत यासंदर्भात चौकशी करण्याच्या आदेश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

आतापर्यंत झालेल्या अनेक कामासंदर्भात हा विषय आहे. कामे मंजूर झाली कोणी केली कशी केली हे सुद्धा कोणाला कळाली नाही. त्यामुळे या पातळीवर जर चौकशी झाली नाही तर राज्य शासनाच्या पातळीवर चौकशी करण्याची मागणी यावेळी मी केली आहे.

संगनमत असल्याशिवाय ज्या कामांची चौकशी करण्याचा आणि त्याची चौकशी होईपर्यंत बिले काढण्याचा आदेश दिला असताना सुद्धा बिले जर निघत असतील तर वरून खाली पर्यंत जी सायपन सिस्टीम आहे त्या सिस्टीमचा प्रभाव एवढा मोठा आहे की इस्टिमेंटपेक्षा ३०० टक्क्यांनी जास्त किंमतीची केली आहेत.

## पर्यटनास आलेले पर्यटक ज्योती जयेंद्र सराफ याचा अकस्मात मृत्यू

**महाबळेश्वर :** पर्यटनास आलेले पर्यटक ज्योती जयेंद्र सराफ यांचा महाबळेश्वर येथील हॉटेल महिद्रा क्लब शेरवुड येथे श्वास घेण्यास त्रास होवुन लागल्यामुळे महाबळेश्वर ग्रामीण रुग्णालय येथे उपचाराकरीता दाखले केले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी ती उपचारापुर्वी मयत झाली असल्याचे सांगितले या दरम्यान महाबळेश्वर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली.

याबाबत महाबळेश्वर पोलिस ठाण्याकडून मिळालेली माहिती अशी की, खबर देणारे जयेंद्र भालचंद्र सराफ (वय ५४) १८८ एफ, भिमराव वाडी, ठाकुरद्वार रोड मुंबई मुंबईहून महाबळेश्वर फिरण्यास आले असता महाबळेश्वर शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या महिंद्रा क्लब शेरवूड या हॉटेलमध्ये मुक्कामी थांबलो असता माझी पत्नी ज्योती जयेंद्र सराफ वय ५३ वर्षे श्वास घेण्यास सोमवारी रात्री बारा वाजताच्या सुमारास त्रास होवु लागल्याने तिला ग्रामीण रुग्णालय महाबळेश्वर येथे आणले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी ती उपचारापुर्वी मयत झाली असल्याचे सांगितले. याबाबत खबरीने तिचे मरणाबाबत माझा कोणावर वहीम अगर संशय नाही असे सागितल्यावर महाबळेश्वर पोलिस ठाण्यात २०२३ कलम १९४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस निरिक्षक यशवंत नलावडे याच्या मार्गदर्शनाखाली ठाणे अंमलदार संतोष शेलार करीत आहे.

## फोनवर बोलताना कार धडकली डिव्हायडरला

**सातारा :** फोनवर बोलत असतानाच अचानकपणे वेगाचं नियंत्रण सुटले अन चारचाकी कार डिव्हायडरला धडकली. पण सुदैवाने कारमधील एअरबॅग ओपन झाल्याने दुर्दैवी घटना टळली. या अपघातात कारच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना मंगळवार, दि. १६ जुलै रोजी साडेचार ते पाच वाजण्याच्या दरम्यान घडली. याबाबतची नोंद करण्याची प्रक्रिया शाहूपुरी पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत सुरु होती.

याबाबत घटनास्थळावरुन व उपस्थित पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टाटाकंपनीची चारचाकी अलश्रोज गाडी क्रमांक एमएच ११ डीएच १८४५ ही सातारा एसटी बसस्थानकासमोरुन निघाली. त्यावेळी ही गाडी एक महिला चालवत असताना फोनवर बोलत होती. फोनवर बोलत असतानाच ब्रेकवर पाय ठेवण्याऐवजी रेसवर पाय ठेवला. अन रस्त्यावरील वेग नियंत्रण न करता आल्याने छ. शाहू क्रीडा संकुल येथील प्रवेशद्वाराच्या येथे पोलिसांनी बॅरीकेट लावलेले असतानाही त्याला घासून थेट सिमेंटच्या डिव्हायडरवर जावून आदळली. या मोठ्या आवाजाने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी एकच गर्दी केली होती. दरम्यान, या चारचाकी गाडीतील एअर बॅग ओपन झाल्याने महिला चालक व गाडीतील इतर जण सुरक्षीतपणे बाहेर पडले. यानंतर या चारचाकी गाडीचा हॉर्न अचानकपणे सतत वाजतच राहत असल्याने अनेकांचे लक्ष वेधून घेत होता. त्यामुळे या परिसरातील वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली होती. शाहूपूरीचे बीटमार्शलने घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. मात्र तक्रार देण्यास कोणीच न आल्याने या घटनेची नोंद रात्री उशिरापर्यंत दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

## ओला आणि सुका कच-यांचे योग्य प्रकारे वर्गीकरण करण्यासाठी जिल्हयात विशेष मोहिम : मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन

**सातारा :** जिल्ह्यातील प्रत्येक घरातील व परिसरातील ओला आणि सुका कचरा योग्य प्रकारे वर्गीकरण करण्यासाठी पुर्ण जिल्हयात सोमवार दिनांक ७ ऑगस्ट २०२४ पर्यंत मोहिम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी दिली आहे.

राज्यातील गावस्तरावर दिनांक ७ ऑगस्ट २०२४ पर्यंत विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. त्यानुसार जिल्हयातील प्रत्येक गावात स्वच्छतेचे दाने रंग- ओला हिरवा, सुका निळा या नावाने अभियान राबविण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्र राज्य डिसेंबर २०२४ पर्यंत हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हागणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करणे यासाठी विविध विषयाच्या उपक्रमामार्फत गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रत्येक गावात ५ संवादकाची निवड करण्यात येणार असून हे संवादक प्रत्येकाच्या घरी जावून स्वच्छतेचे संदेश देणार आहेत. यात सरपंच, उपसरपंच, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही व बचत गटातील महिलांचा समावेश आहे.

ओला कचरा हिरव्या रंगाच्या डब्यात व सुका कचरा निळ्या रंगाच्या डब्यात वर्गीकरण करून त्याचे योग्य व्यवस्थापन करावे प्रत्येकाने नियमित शौचालयाचा वापर करणे, शास्त्रयुक्त पध्दतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, प्लास्टिक व्यवस्थापन, सुयोग्य मैला गाळ व्यवस्थापन, गावात येणाऱ्या छोट्या व्यवसायिक व्यक्तींनी उपलब्ध सार्वजनिक शौचालयाचा वापर करावा याबाबत गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे. भेटी दरम्यान शासनाच्या गुगललींकव्दारे त्या कुटुंबाची फोटोसह माहिती राज्यशासनास सादर करणेत येणार आहे.

सातारा जिल्ह्यतील सर्व गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील गावांमध्ये गृहभेट उपक्रम यशस्वी करणेसाठी ग्रामसेवकामार्फत संवादकांची नेमणूक करुन गृहभेटीचे आयोजन करावे. आसे मा प्रकल्प संचालक संतोष हराळे यांनी सुचित केले आहे.

# संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊरचा रौप्य महोत्सवी वर्षांचा समारंभ उत्साहात संपन्न

**कोरेगाव :** श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेच्या देऊर महाविद्यालयाने गुणवत्तेच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्तुळात मानाचे स्थान मिळविलेले असून आज हे महाविद्यालय रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे ही मोठी उल्लेखनीय बाब आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'अथातो ब्रह्म जिज्ञासा!' या उक्तीप्रमाणे नवीन ज्ञान मिळविण्याची, नवीन गोष्टी जाणून घेण्याची तसेच अज्ञानातून ज्ञानाकडे आणि ज्ञानातून आधुनिक तंत्रज्ञानाकडे जाण्याची गरज आजच्या काळात आहे असे प्रतिपादन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर येथे केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी चवरे यांनी केले.

श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था संचालित प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्ष, डॉ. म्हस्के पुढे म्हणाले की, देऊर महाविद्यालयाची वाटचाल अतिशय गौरवशाली असून या महाविद्यालयाने नुकत्याच झालेल्या छ--उ मूल्यांकनात



'-' ग्रेड संपादन केलेली आहे. या महाविद्यालयाची शैक्षणिक क्षेत्राबरोबरच कला, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात घौडदौड सुरु आहे. पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन स्थापन केलेल्या या महाविद्यालयाने गेल्या पंचवीस वर्षात एक आदर्श निर्माण केलेला असून त्यांची ही गुणवत्तेची परंपरा अशीच निरंतरपणे चालू राहील आणि आगामी सुवर्णमहोत्सवी काळापर्यंत महाविद्यालय एका नव्या उंचीवर पोहोचेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मेजर प्रवीण चव्हाण म्हणाले कि सन १९५६ पासून मुधाईदेवी शिक्षण संस्था गुणवत्ता आणि शिस्त यासाठी देऊर परिसरात ओळखली जाते. या संस्थेतील पदाधिकारी आणि शिक्षक नाविन्याचा ध्यास घेऊन काळानुरूप बदल करणारे असल्याने अनेक गुणवान विद्यार्थी आणि अधिकारी या संस्थेने आणि महाविद्यालयाने घडविलेले आहेत. महाविद्यालयात या वर्षी बी.सी.ए.च्या माध्यमातून नवीन शाखा सुरु करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे एक नवीन दालन आम्ही उपलब्ध करून देत आहोत.

यावेळी सकाळच्या सत्रात श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे चेअरमन हणमंतराव कदम व संस्था सचिव राजेंद्र कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाच्या 'थरश्रश्र ेष ऋाश' भित्तीपत्रीकेचे उद्घाटन, महाविद्यालयाच्या 'रौप्यमहोत्सवी भवन' या नूतन वस्तूचे उद्घाटन व 'मुधाई' नियतकालिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी रौप्य महोत्सवी सांगता समारंभामध्ये मान्यवरांच्या हस्ते या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जयसिंह कदम व डॉ. भारत भोसले यांना तसेच महाविद्यालयाचे पारितोषिक दाते यांना विशेष सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि उपस्थित पत्रकार यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात संस्था चेअरमन हणमंतराव कदम, राजेंद्र कदम, विश्वस्त अडव्होकेट राजेंद्र कदम, माजी प्राचार्य डॉ. जयसिंह कदम, डॉ. भारत भोसले तसेच महाविद्यालयाचे माजी गुणवंत विद्यार्थी यांनी महाविद्यालायाविषयी आपली मनोगते व्यक्त केली.

सदर कार्यक्रमात डॉ. मनोज गुजर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संध्या पौडमल, प्रा. मनीषा पवार, डॉ. सुंदर पोटभरे, प्रा. सुहेल भेंडवडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. हर्षल पवार आणि डॉ. दत्तात्रय शेडगे यांनी केले. या कार्यक्रमास श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संस्था बक्षीस दाते, महाविद्यालयाचे माजी गुणवंत विद्याथी, पत्रकार, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय वर्ग, श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेतील शिक्षक विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. वीरेंद्र तावडे याचा जमीन रद्द

**कोल्हापूर :** ज्येष्ठ कामगार नेते गोविंद पानसरे यांच्या खूनप्रकरणी संशयित आरोपी डॉ. वीरेंद्र तावडे याचा जामीन जिल्हा व सत्र न्यायाधीश (३) एस. एस. तांबे यांनी रद्द करून तावडे याला तातडीने ताब्यात घ्यावे असा आदेश दहशतवाद विरोधी पथकाला (एटीएस) दिला आहे. मंगळवारी (दि. १६) सुनावणीत हा निर्णय देण्यात आला.

विशेष सरकारी वकील शिवाजीराव राणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोविंद पानसरे यांच्या खूनप्रकरणात डॉ. वीरेंद्र तावडे याचा सहभाग असल्याचे पुरावे विशेष तपास पथकाला (एसआयटी) मिळाले होते. तेव्हा संशयित तावडे हा डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनप्रकरणी सीबीआयच्या अटकेत होता. एसआयटीने सप्टेंबर २०१६ मध्ये सीबीआयकडून तावडे याचा ताबा घेतला. पानसरे यांच्या खुनाचा कट रचण्यापासून हल्लेखोरांना प्रशिक्षण देणे, त्यांना शस्त्रे आणि वाहनांची उपलब्धता करून देणे, राहण्याची व्यवस्था करण्याचे काम तावडे याने केल्याचा दावा पोलिसांनी केला होता. दरम्यान, तावडे याच्या वकिलांनी जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. त्यानुसार त्याला जानेवारी २०१८ मध्ये जामीन मंजूर झाला होता. यावर आक्षेप घेत विशेष सरकारी वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुंबई उच्च न्यायालयाने संबंधित प्रकरण जिल्हा न्यायालयात चालवून त्यावर निर्णय व्हावा, असे निर्देश दिले होते. त्यानुसार विशेष सरकारी वकिलांनी डॉ. तावडे याचा जामीन रद्द करण्याची विनंती जिल्हा न्यायालयाकडे केली होती.

# पूजा खेडकरांवर मोठी नामुष्की, युपीएससीच्या इतिहासात पहिल्यांदाच झाली अशी कारवाई

**मुंबई :** वादात अडकलेल्या प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचा जिल्हा प्रशिक्षणाचा कालावधी संपुष्टात आणल्याचे आदेश देण्यात आले आहेत. युपीएससीच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी कारवाई करण्यात आली आहे. पुण्यात चमकोगिरीमुळे चर्चेत आल्यानंतर आणि वादात अडकल्यानंतर पूजा खेडकर यांची वाशिम जिल्ह्यात बदली करण्यात आली होती. पुण्यात ऑडी कारवर अंबर दिवा लावल्याचा आणि वरिष्ठांचे केबिन बळकावल्याचा आरोप त्यांच्यावर होता. त्यानंतर ओबीसी सर्टिफिकिट, दिव्यांग सर्टिफिकीटच्या आधारे आरक्षणाच्या कोट्यातून युपीएससी परीक्षा दिल्यानं त्यांच्या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. अनेक आरोपांमुळे त्यांच्या चौकशीची मागणीही केली जात आहे.

डिओपीटीकडून पूजा खेडकर यांचा प्रशिक्षणार्थी कालावधी संपुष्टात आणल्याचे आदेश करण्यात आले आहेत. त्यांना मसूरीतील लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय अकादमीत हजर रहावं लागणार आहे. पूजा खेडकर यांच्या प्रशिक्षणाला सध्या स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात



आला आहे. पूजा खेडकर यांना महाराष्ट्रातून प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून सेवामुक्त करण्यात आलंय.

महाराष्ट्रात त्या सध्या वाशिम जिल्ह्यात प्रशिक्षणार्थी म्हणून काम करत होत्या. गेल्याच आठवड्यात त्यांची बदली करण्यात आली होती. आता त्यांना मसूरीतील अकादमीत हजर रहावं लागणार आहे. त्यासाठी २३ जुलै पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी आदेशाचे पत्र पूजा मनोरमा दिलीप खेडकर यांना पाठवलं आहे. या पत्राची प्रत राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह संबंधित विभागांना देण्यात आली आहे.

**प्रमाणपत्र देणाऱ्यांचीही होणार चौकशी**

पूजा खेडकर यांच्या दिव्यांग आणि ओबीसी प्रमाणपत्रावरून अनेक आरोप झाले आहेत. आता या प्रकरणी प्रमाणपत्र देणाऱ्यांची चौकशी होणार असून तोपर्यंत पूजा खेडकर यांचे प्रशिक्षण आठवडाभर थांबवण्यात आले आहे. पूजा १५ ते १९ जुलै या कालावधीत अकोल्यातील आदिवासी विकास प्रकल्पात इंटर्न म्हणून रुजू होणार होत्या. मात्र वाशिमच्या जिल्हाधिकाऱ्यांनी याला स्थगिती दिलीय. सादर पूजा खेडकर यांच्या उमेदवारीची पडताळणी करण्यासाठी केंद्राने एक सदस्यीय समिती स्थापन केली आहे. केंद्राच्या अतिरिक्त सचिव दर्जाचे अधिकारी याची चौकशी करत आहेत. २०२३ च्या बॅचच्या अधिकारी खेडकर यांच्या उमेदवारीचे दावे आणि इतर तपशीलांची पडताळणी समितीकडून केली जातेय. ही समिती चौकशीनंतर दोन आठवड्यात या प्रकरणाचा अहवाल सादर करणार आहे.

# कारचे टायर फुटले अन् पलटली

## काँग्रेस नेत्याच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू

**बारामती :** बारामतीमध्ये संत तुकाराम महाराज राष्ट्रीय महामार्गावर भरधाव गाडीचा टायर फुटून भीषण अपघात झाला आहे. या अपघातात इंदापूरमधील काँग्रेसच्या नेत्याच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,बारामती तालुक्यातील रुई इथं ही घटना घडली आहे. या अपघातात इंदापूर तालुक्यातील सणसरच्या युवकाचा जागीच मृत्यू झाला. आदित्य आबासाहेब निंबाळकर असं या तरुणाचं नाव असून तो इंदापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष आबासाहेब निंबाळकर यांचा



मुलगा आहे.

आज संध्याकाळी चारच्या सुमारास बारामती तालुक्यातील रुई गावच्या पाटी नजीक हा अपघात घडला. प्रत्यक्षदर्शींनी सांगितलेल्या माहितीनुसार, आदित्य हा काटेवाडी कडून रुई मार्गे बारामतीत येत होता. त्याच्या चार चाकी गाडीचं टायर फुटल्याने गाडी पलटी झाली. कार वेगात असल्यामुळे ती एका इमारतीच्या कडेला जाऊन आदळली. यात तो गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याला तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# आषाढीनिमित्त दिंडीत पालकमंत्री हसन मुश्रीफ यांचा वारकऱ्यांसमवेत सहभाग



**कोल्हापूर :** बाचणी ता. कागल येथे ग्रामस्थांनी आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळ्याचे आयोजन केले होते. पंढरपूरला निघालेल्या दिंडीचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा; कोल्हापूरचे पालकमंत्री नामदार हसनसाहेब मुश्रीफ यांनी मनोभावे दर्शन घेतले. मंत्री मुश्रीफ गळ्यात विना घेऊन वारकऱ्यांच्या समवेत दिंडीत सहभागी झाले. विठोबा - रखुमाईच्या गजरात सारा गाव दुमदुमून गेला. या दिंडीत न्यू हायस्कूल, दिशा अकॅडमी, ज्ञानप्रबोधिनी, शांती गुरुकुल इंग्लिश स्कूल या शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे संचालक व माजी सरपंच सूर्यकांत पाटील, जिल्हा परिषद सदस्य मनोजभाऊ फराकटे, प्रकाश पाटील, राजेंद्र सुतार, रामचंद्र पाटील, अंकुश हातकर, हिंदुराव पाटील, राजेंद्र सुतार, विठ्ठल खामकर, एम. एस. खामकर, बाबुराव पाटील, नामदेव सडोलकर, रेखा पाटील, पांडुरंग पाटील, अंजना सुतार आदी वारकरी बंधू-भगिनी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशाळगडावर तणावपूर्ण शांतता; शाहू महाराजांनी नुकसानग्रस्तांना दिला आधार

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील विशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या गजापूर गावात रविवारी हिंसक जमावानं काही घरांची मोडतोड केली. येथील नागरिकांना दिलासा देण्यासाठी निघालेल्या इंडिया आघाडीच्या नेते खासदार छत्रपती शाहू महाराज, आमदार सतेज पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी पांढरे पाणी या ठिकाणी रोखलं. तसंच प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना पोलिसांकडून धक्काबुक्की करण्यात आली. या घटनेमुळं जिल्हा प्रशासन, पोलिसांविरोधात नाराजीचा सूर उमटत आहे. गेले दोन दिवस भीतीच्या छायेखाली असलेल्या नागरिकांना शासनानं सर्वतोपरी मदत करावी, अशी मागणी खासदार शाहू छत्रपती महाराज यांनी केली.

नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा



: किल्ले विशाळगड अतिक्रमण मुक्त करण्यासाठी रविवारी माजी खासदार संभाजी राजे छत्रपती यांनी पुढाकार घेतला होता, मात्र या मोहिमेला हिंसक वळण लागलं. विशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या गजापूर गावात अनेक घरांना जमावणं लक्ष करून प्रार्थनास्थळासह दुकानांची नासधूस केली. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी इंडिया आघाडीच्या वतीनं काही साहित्यासह जेवणाची पाकिटे घेऊन कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती महाराज, काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांच्यासह महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना विशाळगडाकडे जाणाऱ्या पांढरे पाणी या ठिकाणी रोखण्यात आलं.

पत्रकारांना रोखलं : यावेळी शाहूवाडीचे प्रांताधिकारी समीर शिंगटे, शाहूवाडी पोलीस ठाण्याचे निरीक्षक विजय गेरडे यांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याशी संपर्क साधला. मात्र, पोलिसांकडून प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी वाद घालण्याचे प्रकार घडले. यामुळं आक्रमक झालेल्या माध्यमांच्या प्रतिनिधींनी गजापूरकडं जाण्याचा प्रयत्न केला, या घटनेमुळं पांढरपाणी या ठिकाणी काही काळ तणाव निर्माण झाला होता. प्रांताधिकारी समीर शिंगटे यांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याशी चर्चा करून माध्यम प्रतिनिधींना गजापूर गावाकडं सोडण्याचा निर्णय घेतला. यावेळी इंडिया आघाडीच्या १५ प्रतिनिधींनाही नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी सोडण्यात आलं.

नुकसानग्रस्त नागरिकांना शाहू महाराजांकडून आधार : गडाच्या पायथ्याशी असलेल्या गजापूर गावातील अनेक घरांवर जमावानं हल्ला केला. आक्रमक जमाव पाहून नागरिकांनी जंगलात आश्रय घेतला. त्यामुळं आज कोल्हापूरचे शाहू महाराजांनी नागरिकांना जेवणाची पाकिटे देऊन आधार देण्याचा प्रयत्न केला. यावेळी अनेक महिलांना अश्रू अनावर झाले.

# महाराष्ट्रात ८६.९० टक्क्यांवर खरीप पेरण्या पूर्ण

**मुंबई :** राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या आता खरीप पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. कृषी विभागाने दिलेल्या पीक पेरणी अहवालानुसार महाराष्टात ८६.९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून १२३ लाख ४१ हजार ५१७ हेक्टरवर या पेरण्या झाल्या आहेत.

मागील वर्षी पावसाचा खंड पडल्यामुळे आणि त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. दरम्यान, यंदा जुन महिन्यात चांगला पाऊस झाल्याने आता खरीप पेरण्या जवळपास पूर्ण झाल्याचे चित्र आहे.

सोयाबीनची ११५ टक्के पेरणी

मागील पाच वर्षांच्या पेरण्यांच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात तब्बल ११५ टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीचे



सोयाबीन अजूनही हमीभावाच्या प्रतीक्षेत असताना राज्यातील शेतकऱ्यांनी पुन्हा सोयाबीन पिकावर विश्वास दाखवला असून ११५ टक्के पेरणी केली आहे. ४७ लाख ७० हजार ४९ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी यंदा झाली आहे.

खरीप ज्वारी ३१.२ टक्क्यांवर

राज्यात यंदा खरीप ज्वारीची ३१.२म वर पेरणी झाली असून ९० हजार १८८ हेक्टरवर शेतकऱ्यांनी खरीप ज्वारीचे पीक घेतले आहे. कोल्हापूरसह नाशिक विभागात खरीप ज्वारीची पेरणी अधिक झाली असून इतर विभागात तुलनेने कमी पेरणी झाल्याचे अहवालात नोंदवले आहे.

राज्यात कापूस पेरणी ९२.६३ टक्क्यांवर

राज्यातील शेतकऱ्यांनी ८ लाख ९१ हजार ४५६ हेक्टरावर यंदा कापूस पेरणी केली आहे. नागपूर विभागात ९६ टक्के क्षेत्रावर कापूस पेरला असून कोल्हापूर व पुणे विभागात १३ ते२० टक्के अधिक कापूस पेरणी झाली आहे.

मराठवाड्यात यंदा दिलासादायक चित्र

मागील वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने खरिपातील पीके धोक्यात आली होती. दरम्यान पावसाच्या खंडामुळे तसेच त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील बहुतांश भागात पिकांनी माना टाकल्या. राज्यभरात सध्या पावसाचा जोर वाढला असून खरीप पेरण्या बहुतांश ठिकाणी झाल्याचे चित्र आहे.

**कोणत्या विभागात किती टक्के पेरणी झाली?**

| विभाग | पेरणी |
| --- | --- |
| कोकण | ३४ म |
| नाशिक | ८४.१४ म |
| पुणे | १०९.४१ म |
| कोल्हापूर | १०३.०४ म |
| छ. संभाजीनगर | ९३.५० म |
| लातूर | ९४.३८ म |
| अमरावती | ९१.०८ म |
| नागपूर | ५७.७० म |
| एकूण | ८६.९० म |

# मी पुन्हा विधान परिषदेत निवडून येईन शेकापचे जयंत पाटील यांचा निर्धार

**अलिबाग :** विधान परिषद निवडणूकीत झालेला पराभव जिव्हारी लागला आहे. या पराभवाचे दु:ख मलाही आहे. पण मी विधान परिषदेवर लवकरच पुन्हा निवडून येईन, असा विश्वास शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त केला. पाटील यांनी अलिबाग शेतकरी भवन येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी माजी आमदार सुभाष पाटील, सुरेश खैरे, चित्रलेखा पाटील यांच्या सह पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. विधान परिषद निवडणूकीसाठी महाविकास आघाडी कडून दोनच उमेदवार देण्याचे ठरले होते. मात्र शिवसेना ठाकरे गटाने शेवटच्या क्षणी तिसरा उमेदवार उभा केला. त्यामुळे आपली अडचण झाली. काँग्रेसनेही त्यांच्याकडे असलेली अधिकची मते दोन्ही उमेदवारांना विभागातून दिली असती, तर निकालाचे चित्र वेगळे असते.

हितेंद्र ठाकूर यांनी शेवटच्या क्षणी त्यांनी मला मते दिली नाहीत, असा आरोप जयंत पाटील यांनी केला. त्याचवेळी विधान परिषद निवडणूकीत आमदारांची मते २५ कोटींना विकत घेतली गेली असा दावाही त्यांनी केला. या निवडणूकीत शरद पवार यांनी मनापासून सहकार्य केले. ते माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहीले त्यांनी केलेली मदत मी विसरू शकणार नाही. ज्यांना जिल्हा मध्यवर्ती बँक असो अथवा इतर माध्यमातून करोडो रुपयांची मदत केली त्यांनी फसवल्याची खंत पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. झालेल्या चुका बाजूला ठेऊन आता पुढे जायचे आहे. नव्याने पक्षाची बांधणी करायची आहे. विधानसभेची तयारी करावी लागणार आहे. देशात छोट्या पक्षांना महत्व प्राप्त झाले आहे.

# केवळ नशीब अथवा देवाच्या दयेने बचावलो: प्राणघातन खाल्ल्यानंतर ट्रम्प यांची प्रतिक्रिया

**वॉशिंग्टन :** अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचार सभेदरम्यान उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यातून बचावलेले ट्रम्प पुन्हा निवडणूक प्रचाराच्या कामात कार्यरत झाले आहेत. आपल्यावर झालेला हल्ला हा एक विचित्र अनुभव होता. त्यातून केवळ नशिबाने किंवा देवाच्या कृपेने बचावलो, अशी प्रतिक्रिया ट्रम्प यांनी व्यक्त केली.

पेन्सिलवानिया या ठिकाणी प्रचार मोहिमेदरम्यान अमेरिकेचे माजी अध्यक्ष आणि अध्यक्षीय निवडणुकीतील उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर थॉमस मॅथ्यू कृक्स या वीस वर्षीय युवकाने गोळीबार केला. या गोळीबारात सभेतील एक प्रेक्षक दगावला तर दोन जण जखमी झाले. ट्रम्प यांच्या दिशेने झाडलेली गोळी त्यांच्या कानाला चाटून गेल्यामुळे ते बचावले. हल्लेखोराला सुरक्षारक्षकांनी जागीच ठार केले. या घटनेनंतर कानाला पट्टी बांधून डोनाल्ड राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात उपस्थित झाले. या अधिवेशनात ट्रम्प यांच्या उमेदवारीची घोषणा केली जाणार आहे. आपल्यावर झालेल्या हल्ल्याबद्दल बोलताना ट्रम्प म्हणाले की, हा हल्ला म्हणजे एक विचित्र अनुभव होता. जणू माझे मरण निश्चित करण्यात आले होते. मात्र, केवळ नशिबाने अथवा देवाच्या दयेने मी या हल्ल्यातून वाचलो. बंदुकीतून गोळी माझ्या दिशेने येत असताना मी नकळतपणे मानेची जी काही हालचाल केली त्यामुळे जीवावर आलेले कानावर निभावले. अन्यथा त्या गोळीने निश्चितपणे माझा प्राण घेतला असता.